े

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं. ०२० / २६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९. फॅक्स नं.- ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/२०१६/ऑनलाइन प्रवेश/मवि-१ /५४५२ दिनांक- २६/०४/२०१६

26 APR 2016

प्रति,

कुलसचिव,

सर्व अकृषी विद्यापीठे.

विषय :- सर्व अभ्यासक्रमांचे प्रवेश ऑनलाईन होणेबाबत.

संदर्भ :- १) शासन पत्र क्र.संकीर्ण- २०१६/प्र.क्र.३० /विशि-३ , दि.०६.०२.२०१६

२) विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र दि.२८.१२.२०१५

३) संचालनालयाचे पत्र जा.क्र.३१४०, दि.१०.०३.२०१६

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्रांकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.(प्रत संलग्न) सर्व अभ्यासक्रमांचे प्रवेश ऑनलाईन पद्धतीने करावे अशा सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने संलग्न विद्यापीठांना दिलेल्या आहेत. प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता यावी याकरिता सन २०१६-१७ या वर्षापासून ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची अमंलबजावणी करण्याबाबत निर्देशित केलेले आहे. सदर बाबत सदर विषयाबाबत उपरोक्त संदर्भ क्र.२ विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पत्रात दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्याच्या सूचना संचालनालयाचे संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये आपणास देण्यात आलेल्या आहेत.

विद्यापीठांशी संलग्नित सर्व महाविद्यालयांतील ऑनलाईन प्रवेश करण्याकरिता विद्यापीठाने आपल्या स्तरावर एकाच संगणक प्रणालीचा (software) वापर करावा. तसेच विद्यापीठांशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे कामकाज / व्यवस्थापनाकरिता सुध्दा आपल्या स्तरावर एकाच सर्वसमावेशक संगणक प्रणालीची निवड करावी. असे केल्यास कामात अधिक सुसूत्रता व पारदर्शकता येईल.

179 / 28-4-16

सदर विषयाबाबत त ात्काळ कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबतचा अनुपालन अहवाल शासनास तसेच संचालनालयास सादर करावा.

(डॉ. धनराज माने)
संचालक
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य , पुणे- १

प्रत-

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

---

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती.
क्रमांक :संगाबाअवि/८/सी- ८२९ /२०१६.
दिनांक : २९-०४-२०१६

प्रति,

**प्राचार्य,**
**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी**
**संलग्नीत सर्व महाविद्यालये.**

**मा.संचालक,(उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१ यांचे पत्र क्र.उशिसं/२०१६/ऑनलाईन प्रवेश /मवि-१/५४५२, दि. २६.०४.२०१६ च्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सन २०१६-१७ वर्षापासून आपल्या महाविद्यालयातील सर्व अभ्यासक्रमाचे प्रवेश ऑनलाईन करण्याबाबत निर्देश दिलेले आहे. सदर पत्र व त्यासोबतचे सहपत्रे पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव पाठविण्यात येत आहे. तरी कृपया मा.शिक्षण संचालकांनी दिलेल्या निर्देशाचे पालन करावे, ही विनंती.**

उपकुलसचिव (म.वि.),
संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ.

**प्रत :**

**संचालक,(उ.शि.),शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१**